# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १६९ वा ❑ गुरूवार दि.२१ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## सट्ट्यावर सत्तेची नजर...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

काम न करता श्रीमंत होणे, हे स्वप्न जरी सुंदर असले तरी, ते प्रत्यक्षात आणणे खूप कठीण आहे. बहुतेक लोक कठोर परिश्रम आणि गुंतवणुकीतून श्रीमंत होतात. निष्क्रिय उत्पन्न आणि स्मार्ट आर्थिक निर्णय घेऊन श्रीमंती मिळवता येते, पण त्यातही थोडाफार काम तर करावाच लागतो.मात्र काही लोक काम न करता उत्पन्नाचे अवैध मार्ग शोधत असतात.. सट्टा व ऑन लाईन गेमिंग हा देखील त्यातील एक प्रकार.आज अनेक तरुण तरुणी,विद्यार्थी,उद्योजक, व अनेक सटोळे ऑन लाईन गेमिंग अँप व ऑन लाईन रम्मी मध्ये गुंतले असून ही व्यसनाधिनता दिवसेंदिवस वाढत असल्याने अनेक लोकांची फसवणूक देखील होत असल्याने या ऑनलाइन गेमिंग वर आता सरकारची नजर गेली आहे. ऑनलाइन बेटिंग ॲप्स संबंधित वाढते फसवणुकीचे प्रकार, बेटिंग प्लॅटफॉर्मच्या जाहिराती करणारे सेलिब्रिटी आणि इन्फ्लु एंजल्स नियमांकडे दुर्लक्ष करणारे परदेशी ऑपरेटर्स ऑनलाइन गेमिंग सुरक्षितता जबाबदार आणि उत्तरदायी करण्याची गरज लक्षात घेऊन सरकारने ऑन लाईन गेमिंगवर आळा घालण्याचा निर्णय घेतला आहे.

मोदी सरकारने ऑनलाइन मनी गेमिंगविरुद्ध मोठे पाऊल उचलले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ऑनलाइन गेमिंग विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे. याचा अर्थ असा की आता भारतात पैशाशी संबंधित गेमिंग व्यवहारांवर बंदी घालण्यात येईल.यासंबंधी एक विधेयक लोकसभेत मांडण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ऑनलाइन गेमिंग विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे. या विधेयकाअंतर्गत ऑनलाइन बेटिंग हा दंडनीय गुन्हा असेल आणि पैशांशी संबंधित गेमिंग व्यवहारांवर पूर्णपणे बंदी घातली जाईल.

या विधेयकाचा मुख्य उद्देश भारतातील ऑनलाइन गेमिंगचे नियमन करणे आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे जुगार खेळणे हा गुन्हा घोषित करणे आहे. हे विधेयक विशेषतः गेमिंग व्यसन, फसवणूक आणि राज्यांमधील कायद्यांची विसंगती यावर लक्ष केंद्रित करते.

ऑनलाइन गेमिंग आधीच कर कक्षेत आहे. मोदी सरकारने त्यांच्या शेवटच्या कार्यकाळात, ऑक्टोबर २०२३ पासून ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्मवर २८ टक्के जीएसटी लागू केला आहे. या आर्थिक वर्षापासून तो २ टक्क्यांनी वाढवण्यात आला आहे. म्हणजेच, २०२५ च्या आर्थिक वर्षापासून ऑनलाइन गेम जिंकण्यावर ३० टक्के कर लादण्यात आला आहे.

गेल्या चार-पाच वर्षांत १४०० हून अधिक ॲप्सवर बंदी घालण्यात आली आहे. परंतु या दिशेने कोणताही कायदा नसल्याने ऑनलाइन गेमिंग ॲप्सवर ठोस कारवाई करता आली नाही.जर ऑनलाइन गेमिंग कायदे लागू केले गेले, तर ऑनलाइन बेटिंग हा गुन्हा मानला जाईल. अनधिकृत प्लॅटफॉर्मचा प्रचार करणाऱ्या सेलिब्रिटी आणि प्रभावकांवरही कारवाई केली जाईल. बेकायदेशीर बेटिंगसाठी ७ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची तरतूद असू शकते.

सध्या, मोठे क्रिकेट स्टार आणि इतर सेलिब्रिटी ऑनलाइन गेमिंग ॲप्सचा प्रचार करतात. आता, अशा गेमिंग ॲप्सचा प्रचार करण्यासाठी दंड आकारला जाईल. तथापि, असेही म्हटले जात आहे की हा प्रस्तावित कायदा लागू झाल्यावर ऑनलाइन गेमिंग ॲप्सच्या व्यवसायावर परिणाम होऊ शकतो. सध्या, भारतातील ऑनलाइन गेमिंग व्यवसाय ३.८ अब्जचा आहे आणि यापैकी, ३ अब्जचा व्यवसाय करणारे गेमिंग ॲप्स कोणत्या ना कोणत्या प्रकारे पैशाच्या व्यवहारांशी जोडलेले आहेत आणि त्या सर्वांवर बंदी घातली जाईल.

गेमिंग क्षेत्रातील तज्ञांचे म्हणणे आहे की सरकार देशांतर्गत पातळीवर व्यवसाय करणाऱ्या ॲप्सवर बंदी घालेल, परंतु परदेशातून चालणाऱ्या गेमिंग ॲप्सवर देखील कारवाई करणे आवश्यक आहे. परदेशातून चालणारे गेमिंग ॲप्स सरकारला कोणताही कर देखील देत नाहीत आणि भारतीयांचे पैसेही परदेशात जातात.

# सोहळा – क्षितिजगामी एक प्रवास अपराजित जिद्दीचा



**ज्योतिर्मय साहित्य**

**नागपूर (प्रभाकर कापसे)–** श्रावणातल्या शेवटच्या सोमवारी यंदा, स्थानिक लोकांची शाळा परिसरात त्याच शाळेच्या एका राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असलेल्या माजी विद्यार्थिनीने लिहिलेल्या एका पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने मराठी भाषेच्या वक्तृत्वपूर्ण भाषणांचा आस्वाद घेता आला. त्यावेळी मला क्षणभर मनं भारावणाऱ्या साहित्याची जणू हिरवळच चहुकडे दाटल्याचा भास झाला. निमित्त होते, मूळ नागपूरकर असलेली, याच शाळेची एक माजी नीता भोयर नामक विद्यार्थिनी! आणि लग्नानंतर सौ. नीता चापले म्हणुन मुंबईकर झाल्यानंतर तिने लिहिलेल्या ''क्षितिजगामी एक प्रवास अपराजित जिद्दीचा'' या आत्मकथनरुपी पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचा !

तिच्या खडतर जीवनप्रवासाचे वर्णन तिने या पुस्तक रूपाने प्रस्तुत केलेल्या लेखन शैलीचे कौतुक करण्यासाठी नागपुरातील भारदस्त वक्ते, पाहुणे म्हणुन या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणुन शरदराव निबाळकर, कृषितज्ञ् व माजी कुलगुरू पंजाबरावं कृषी विद्यापीठ अकोला, पुस्तकाचे समीक्षण करण्यासाठी, प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक व्ही.एस जोग, प्रसिद्ध लेखिका श्रीमती भारती सुदामे, मनोहर ढोक व्यासपीठावर विराजमान होते.

खेळण्याची जिद्द आपण कायम ठेवल्याने मला हा क्रीडा जीवनातील प्रवास करता आला असे लेखिका नीताने आपले मनोगत व्यक्त केल्यानंतर, श्रोत्यांना हमखास जिंकण्यात यशस्वी भाषण शैलीचा हातखंडा असलेल्या शरदराव निबाळकरांनी यावेळी उपस्थित विद्यार्थी श्रोत्यांशी संवाद साधला. नीताने अपराजित जिद्द अंगीकारूनच जीवन गगनात यशस्वी भरारी घेतल्याचे सर्वप्रथम त्यांनी नमूद केले. याचे वर्णन करताना तिने स्वतःला कसे पंख जोडले हे सांगण्यासाठी त्यांनी साहित्य मनोरंजनाच्या गगनात विद्यार्थ्यांना घेऊन अशी काही भरारी मारली की शाळकरी विद्यार्थी तर क्षणभर आपण जमिनीवर आहोत की आकाशात अशा भ्रमात पडले. विद्यार्थी श्रोत्यांना भारवून सोडताना नीतांसारखा खडतर व यशस्वी जीवन प्रवास करण्यासाठी पंखच असावे लागतात हे सांगून त्यांनी असे पंख फुटण्यासाठी जीवनात नीतासारखी जिद्दच अंगी बांणवावी लागते असेही ते म्हणाले. ती जिद्द तिने पुढे कायम ठेवल्यानेच तिला राष्ट्रीय स्तरावरील यशस्वी क्रिकेटपटू, जलतरणपटू व पावरलिफ्टर म्हणुन भरारी घेता आली. प्रारंभी तिने एक एक पायरी कशी चढली व अखेर तिने पुढे कशी भरारी घेतली हेही त्यांनी खुमासदार पद्धतीने सांगितले. तिचा हा वसा गिरवण्यासाठी तिच्या क्षितिजगामी या पुस्तकातच तुम्हाला हे पंख फ ुटण्याचे रसायन साठवून ठेवल्याचेही ते म्हणाले. नीतासारखे विद्यार्थी पुन्हा पुन्हा या शाळेत घडविण्यासाठी तसे शिक्षकही या शाळेत घडले पाहीजेत. त्यांसाठी तिने लिहिलेल्या या पुस्तकातील साठवलेले रसायन अंगी बाणवल्याशिवाय शक्य नाही म्हणून तिचे हे पुस्तक जरूर वाचा असेही शेवटी त्यांनी आग्रहाने विद्यार्थ्यांना आवाहन केले.

एकामागून एक शिखर गाठून ते पादाक्रांत करणे यालाच क्षितिजगामी म्हणतात असे पुस्तकावर भाष्य करताना मनोहर ढोक म्हणाले. आपल्या जीवन प्रवासात सामोरे जाताना मनाला दुखावणाऱ्या वेदनादायक अडचणीवर मात करून यशाचे शिखर गाठणाऱ्या नीताला अशा अडचणी इतरांसमोर येऊ नये असे तिला मनोमन वाटले. म्हणुन तिचा हा लेखन प्रपंच मोलाचा वाटतो त्यामुळे तो तिच्या स्वतःपुरता नसून समाजासाठीही असल्याचे मनोहर ढोक म्हणतात. त्यामुळे तिचे हे आत्मकथन समाजासाठी मार्गदर्शिका असून ते समाज प्रबोधनाचेही कार्य करते. असे सांगून पुस्तकातून स्वतःबरोबर समाजाचाही तिने केलेला बिचार कौतुकास्पद असल्याचेही ढोक शेवटी म्हणाले.

पुस्तकाचे समीक्षण करतांना, प्रसिद्ध समीक्षक व लेखक वि. स. जोग यांनी मराठी भाषेत आत्मचरित्र लेखनाचा १७५ वर्षाचा इतिहास असल्याचे सांगून नीताचे हे मराठीतले १५० वे आत्मचरित्र असल्याचे ते म्हणाले. लेखिकेने स्वतः ते लिहून स्वतः प्रकाशित केलेले हे मराठीतील. एकमेव आत्मचरित्र असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. क्रिकेट हा श्रीमंतांचा खेळ असताना या खेळावर सर्वसामान्य बहुजनही वर्चस्व गाजवू शकतात हे लेखिकेने स्वतः सिद्ध केल्याने तिने आपल्या पुस्तकातून समाजाला चांगला आशयाचा संदेश दिल्याचे अधोरेखीत झाल्याने हे पुस्तक मराठीतले एक उत्कृष्ठ वांग्मय ठरते असेही ते म्हणतात. एक चांगली क्रिकेटपटू, जलतरणपटू व राष्ट्रीय पॉवर लिफ्टर अशी एक उत्तम खेळाडू एक उत्कृष्ठ लेखक होऊ शकते हे या पुस्तक प्रकाशनानंतर सिद्ध झाल्याचेही जोग शेवटी म्हणाले. लेखिका नीताचे कौतुक करताना सुप्रसिद्ध साहित्यिका भारती सुदामे यांनी लेखिकेच्या लेखन शैलीबरोबर तिच्या पुस्तकाचे मुख्य शिर्षक'' क्षितिजगामी'' व उपशिर्षक ''एक प्रवास अपराजित जिद्दीचा'' याचेही कोतुक केले. ज्या लोकांची शाळा येथे शिक्षण घेतल्यानंतर आपल्या पुस्तक प्रकाशनासाठी आपल्या याच शाळेचा परिसर निवडल्या बद्दलही त्यांनी नीताचे कौतुक केले. प्रकाशनासाठी आपल्या शाळकरी मैत्रिणी व क्रीडा जीवनातील मैत्रिणी यांना आमंत्रित केले या तिच्या मैत्री प्रेमाचेही त्यांनी कौतुक केले. आपल्या या शाळेतून भविष्यात असंख्य खेळाडूंनी भविष्यात नावं कमवावे यशाची शिखरं गाठावी ही भावना मनात ठेवून नागपुरातील आपल्या शाळेतच हा प्रकाशन सोहळा आयोजित व्हावा या तिच्या जिद्दीचे, तसेच यासाठी आपल्या शाळेच्या व्यवस्थापनास राजी करण्यासाठी तिने केलेल्या प्रयत्नाचेही भारती ताईंनी मनभरून कौतुक केले. प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व शारदा स्तवन झाले. उत्कृष्ठ निवेदन व आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

## शेवाळा येथील श्री चक्रधर स्वामी राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

**हिंगोली –** कळमनुरी तालुक्यातील शेवाळा येथील चक्रधर स्वामी राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार नुकतेच जाहिर झाले असून यामध्ये अलका मोकाशी, सर्वोत्तम सताळकर, निशा डांगे, भारत सातपुते, आशा नेगी, डॉ. प्रविण मस्तूद यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. लवकरच एका विशेष कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण केले जाणार असल्याचे पुरस्कार समितीचे अध्यक्ष अनिल कपाटे यांनी सांगितले.




शेवाळा येथील श्री चक्रधर स्वामी सार्वजनिक वाचनालय, च्या माध्यमातून मराठी वाङ्‌मय क्षेत्रामध्ये मानाचा असलेला राज्यस्तरीय श्री चक्रधर स्वामी वाङ्‌मय पुरस्कार दिला जातो. यावर्षी या पुरस्काराचे हे २४ वे वर्ष आहे. यावर्षी या पुरस्कारसाठी ता. १ एप्रिल २०२४ते ३१मार्च २०२५ या कालावधीतील प्रकाशित झालेली सर्वच वाङ्‌मय प्रकारातील ग्रंथ आमंत्रित करण्यात आली होती. श्री चक्रधर स्वामी साहित्य पुरस्कार समितीचे संयोजक अध्यक्ष अनिल मनोहर कपाटे शेवाळकर, गोविंद आराध्ये, यशवंत जामोदकर,सागर कपाटे यांनी जाहीर केले आहे.

यावर्षी पुरस्कार प्राप्त प्रतिभावंतांमध्ये कादंबरी : गुंतवळ (अलका मोकाशी नागपूर), कथासंग्रह : दुभंग (सर्वोत्तम सताळकर, कलबुर्गी गुलबर्गा), ललित: कपाळ गोंदण निशा डांगे, पुसद), आत्मचरित्र : जागरण (भारत सातपुते, लातुर), अनुभव कथन: ब्युटी ऑफ लाईफ (आशा नेगी, पुणे), इतिहास संशोधन: मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारितेचा इतिहास (डॉ. प्रविण मच्छिंद्र सुरेखा मस्तुद, बार्शी) यांची निवड झाली आहे.

यावेळी परिक्षण समिती मध्ये अनिल शेवाळकर,प्रा.रमेश वाघमारे, प्रा.स्वाती कान्हेगावकर, डॉ.काळे, इंजि. सागर कपाटे, श्री देवानंद मुंढे, वैभव वानखेडे, यशवंत जामोदकर, संतोष वानखेडे, उत्तमराव सूर्यवंशी यांनी काम पाहिले. लवकरच एका विशेष कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण केले जाणार असल्याचे कपाटे यांनी सांगितले.

## लोकराज्य विशेषांकाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई –** युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या नामांकनात समाविष्ट करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ गडकिल्ल्यांच्या संदर्भात माहिती व जनसंपर्क विभागाच्या लोकराज्य मासिकाच्या विशेषांकाचे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सांस्कृतिक कार्यमंत्री ॲडआशिष शेलार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, मृदू व जलसंधारण मंत्री संजय राठोड, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, अन्न व औषध प्रशासन मंत्री हसन मुश्रीफ, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आदींसह मुख्य सचिव राजेश कुमार, माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे साक्षीदार असलेल्या शिवनेरी, राजगड, रायगड, प्रतापगड, पन्हाळगड, लोहगड, साल्हेर, खांदेरी, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जिंजी या १२ गडकिल्ल्यांच्या ऐतिहासिक, भौगोलिक आणि सामरिक पैलुंबाबत माहिती या अंकात देण्यात आली आहे.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - 22



राशीचक्रातील सातव्या क्रमांकाची रास 'तुळ' किंवा 'तुला! 'वायु' तत्वाची ही रास आहे. या राशीचा 'आराध्य वृक्ष,' 'बकुळ' हे फुलझाड आहे. राशीचा स्वामी 'शुक्र' महाराज आहेत. या व्यक्ती न्यायप्रिय असतात. यांना सुंदर अभिरुची असते.

'विशाखा' 'स्वाती किंवा 'चित्रा' नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तीची रास, तुळ 'असते. पैकी विशाखा आणि चित्रा या नक्षत्रावर 'कन्या' किंवा 'वृश्चिक' या राशीचा देखील प्रभाव दिसतो.

या राशीचे जातक खूपदा तौलनिक अभ्यास नव्हे तर 'विचार' करत बसतात. प्रसंगी त्यांचं त्यात नुकसानही होवू शकतं. 'तुला' म्हणजे 'तराजु, कधी एक पारडे जड... तर कधी दूसरं पारडं जड. मग इथे आपण एका पारड्याला 'लाभा'च्या विचारांचं पारडं म्हणु तर दुसऱ्या पारड्याला 'तोट्या'चे पारडे संबोधु...!!

अशा परिस्थितीत आपला 'लाभ' कशात आहे? हे शोधायचे असेल तर अशा जातकांनी 'पांढऱ्या' आणि 'गुलाबी' रंगांचा प्रभाव असलेल्या कपड्यांचा, खाद्य पदार्थांचा, फळा-फुलांचा अधिकाधिक उपयोग करावा.

या राशीच्या तीन नक्षत्रांपैकी, अनुक्रमे 'चित्रा' (बेल); 'स्वाती' (अर्जुन); 'विशाखा' (नागचाफा) यांच्या नक्षत्रदेवता अनुक्रमे 'त्वष्टा', 'वायु' आणि 'इंद्राग्नि' या आहेत. कंसात नमूद केलेले, त्या त्या नक्षत्रांचे 'आराध्य वृक्ष' आहेत.

या नक्षत्रांचा, त्यांच्या आराध्य वृक्षांचा आणि त्यांच्या आराध्य देवतांचा या राशीच्या व्यक्तीवर परिणाम होत असतो. विचारांची दोलायमानता टाळण्यासाठी, संभाव्य तोट्यांचा प्रसंग येवुनये म्हणून 'वास्तुशास्त्र पेंटींग' यांना आश्चर्यकारक रित्या 'लाभा' कडेच घेवून जाते. कारण या पेंटींग मध्ये 'तुला' राशीच्या जातकांच्या वैयक्तिक माहितीचा अंतर्भाव करुन, विशिष्ट रंग, आकार चिन्ह, प्रतिक आणि नक्षत्र देवतांचा जप वा मंत्राक्षरांचा उपयोग करून एक, अचुकतेकडे जाणारे चित्र 'संकल्पन' साकारले जाते. हे 'चित्र संकल्पन' म्हणजेच 'तुला' राशीच्या जातकाचे 'वास्तुशास्त्र पेंटींग' होय. अनुभव हीच खात्री असते म्हणून असे 'पेंटींग' घरात लावायला हरकत नाही.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238


## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.




## जात्यावरच्या ओव्या......

रुक्मिणींन पती
अडवला आडभिती
खरं सांगा विठ्ठला,
जनी तुमची कोण होती? ||२१७||

गावातल्या गावामधी
तुला कशासाठी दिल ?
जीवाला झाल दुख
इतल्या वाढुळ काय केलं? ||२१८||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## लोकमाता अहिल्याबाई होळकर - भाग २




ज्योतिर्मय साहित्य

मल्हारराव होळकरांच्यानंतर सैनिकी नेतृत्वाचं मोठं ओझं पडलं ते तुकोजीरावांवर. या टप्प्यावर त्यांनी तुकोजी होळकर यांना युद्धक्षेत्र आणि सीमासंरक्षण यासाठी तयार केलं. तुकोजी हे मल्हाररावांचे विश्वासू सेनानायक होते. अहिल्याबाईंनी त्यांच्यावर विश्वास टाकून त्यांना उत्तरदायित्व दिलं. ते जरी सक्षम सेनापती होते. तरीही अहिल्याबाईंनी त्यांना केवळ सैनिकीच नव्हे, तर नैतिक, प्रशासनिक दृष्टिकोनही दिला. त्यांना सांगितलं ''लढाई जिंकणं हे अंतिम ध्येय नाही, तर लोकांचं मन जिंकणं महत्त्वाचं आहे. लष्करचं बळ हे केवळ शस्त्रात नाही, तर नीती आणि अनुशासनात असतं.'' प्रत्येक मोहिमेपूर्वी आणि नंतर अहिल्याबाई स्वतः त्यांच्याशी चर्चा करीत आणि अनुभव जाणून घेत आणि योग्य मार्गदर्शन करीत. जेव्हा तुकोजीरावांनी काही लढायांमध्ये विजय मिळवला, तेव्हा अहिल्याबाईंनी स्वतः त्यांच्या कर्तृत्वाचं खुलेपणाने कौतुक केलं, पण त्याचवेळी अहंकार टाळण्याचंही सांगितलं. पुढे तुकोजीराव एक निपुण सेनापती आणि विश्वासू अधिकारी म्हणून ओळखले गेले.




अहिल्याबाईंसारखा नेता जो सहकाऱ्याला घडवतो, मार्ग दाखवतो, पण नियंत्रण ठेवत नाही दुर्मिळ असतो. अहिल्याबाईंचा हा गुण विशेष मानला जातो. स्वराज्यासाठी अशी लढणारी माणसं अहिल्याबाईंनी घडवली.

अहिल्याबाईंचं प्रशासन हे अठराव्या शतकातील एका आदर्श राज्यकर्त्याचं उदाहरण ठरतं. त्यांनी सत्तेचा उपयोग स्वतःच्या वैभवासाठी न करता प्रजेच्या कल्याणासाठी केला. त्यांचं राजकारण हे शांततेच्या धोरणावर आधारित होतं. त्यांनी युद्धांपेक्षा समाज उभारणी, न्यायनिवाडा आणि सर्वसामान्यांच्या गरजांकडे लक्ष दिलं.

त्यांच्या कारभारातील प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे न्यायनिष्ठा आणि पारदर्शकता. प्रत्येक सकाळी त्या राजदरबारात बसत आणि स्वतःच जनतेच्या तक्रारी ऐकत. अगदी सामान्य शेतकऱ्यापासून ते सरदारांपर्यंत प्रत्येकाला आपल्यापर्यंत सहजपणे पोहोचता यावं, अशी त्यांची व्यवस्था होती. ''राजा म्हणजे प्रजेचा सेवक'' हे त्यांनी आपल्या वागणुकीतून सिद्ध केलं. त्यांची न्यायदानाची पद्धत समाजातील प्रत्येक घटकाचा सर्वंकष विचार करणारी होती. एक प्रसंग उल्लेखनीय आहे एका मोठ्या सरदाराने शेतकऱ्याची जमीन बळकावली होती. अहिल्याबाईंनी ते प्रकरण चौकशीसाठी घेतलं. न्यायालयात पुरावे आणि साक्षी घेतल्यावर सरदाराच्या विरोधात निर्णय दिला आणि शेतकऱ्याची जमीन शेतकऱ्याला परत केली. त्यांनी त्या सरदाराला शिक्षा दिली नाही तर लोकांसमोर क्षमा मागायला लावली एवढे औदार्य त्यांच्या स्वभावात होते आणि न्यायदानात लवचिकताही होती. एखाद्या प्रशासकाने सत्तेचा सुयोग्य वापर कसा करावा याची साक्ष अहिल्याबाईंच्या जीवनातील अनेक घटना पदोपदी देतात.

त्यांचं अर्थकारण अत्यंत शिस्तबद्ध होतं. महसूल संकलनाच्या नवीन योजना राबवल्या गेल्या, पण त्या प्रजेचे अनाठायी शोषण करणाऱ्या नव्हत्या. शेती, सिंचन, जलव्यवस्थापन यावर भर दिला गेला. त्या काळी नर्मदा नदीकाठी आणि इंदूरच्या आसपास अनेक तलाव, विहिरी, घाट यांची उभारणी झाली जी आजही दिसून येतात. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

जसे रात्री नंतर दिवस उगवतो अंधार नाहीसा होतो. तसेच एका मूळ स्वरूपातून हे सारे विश्व व्यक्त दशेला येते व पून्हा त्याच स्वरूपात लय पावते. त्या आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले की अज्ञान नाहीसे होते. आपण बांधले गेलो आहोत असा अज्ञानातून होणारा भ्रम नाहीसा होतो. आपण विश्वापेक्षादेखील विशाल असताना स्थळ काळांनी वेढल्यामुळे जणूकाय बद्ध आहोत. ते विश्वच मुळीस्वरूपात लीन झाल्याने आत्मज्ञानी पुरूशालाबद्ध पणाची भावना उरत नाही

आत्मज्ञान झाल्यावर हा सगळा विरोध मावळतो. आत्मस्वरूप अनत असल्याने ज्याला ज्या पद्धतीने विषय समजला आहे, तो त्या प्रमाणे मथ मांडतो

आत्मज्ञी पुरूषाच्या अनुभव सर्व समावेशक असल्याने त याच्या मताला व्यापक व खोलवर विचार विचार केला पाहिजे.

वेदान्ताच्या मते शुद्धज्ञान कसे असते?

अज्ञानाचा मल नसलेले अगदी शुद्ध आत्मस्वरूप या द्रुष्य चराचराचें मूळ आहे असा प्रत्यक्ष अनुभव येऊन जे ज्ञान होते त्यास वेदान्यांमध्ये शुद्धज्ञान असे म्हणतत.


''मोक्ष देणारे ब्रम्हज्ञान''

आपण आपल्या मूळ स्थानाचा म्हणजे स्वरूपाचा शोध केला तर आपण स्वस्वरूपाचा शोध केला तर आपण आत्मस्वरूपात जातोसते स्वस्वरूप ज्ञानमय असल्याने तेथे अज्ञान आपोआपच नाहीसे होते म्हणून आत्म्याला मोक्ष देणारे ब्रम्हज्ञान असे म्हणतात.

'' मी कोण आहे ?

हे जाणण्याचा हेतु बाळगून जर आपण शोध घेऊं लागलो तर खर मी देहाच्या पलीकडे आहे असा अनुभव येऊ लागतो

## नाम हे परमात्मस्वरूपच आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम म्हणजे भगवंताचे नाव. साधन या दृष्टीने देवाच्या निरनिराळ्या नावांत फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे, तर शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की, भगवंत मुळात जो निर्गुण, निराकार आहे तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नाम-रूप लागले; आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले, म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण आणि निर्गुण भक्तीला आधार नामाचाच आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवऱ्याशी एकरूप होऊन जाते, त्याप्रमाणे वृत्तीचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप बनली पाहिजे. नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे, आणि वृत्तिसुद्धा सूक्ष्म आहे; म्हणून नाम घेण्याने वृत्ती सुधारेल, वृत्ती सुधारली की चित्त शांत होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळ्यांचा भावार्थ एकच आहे.

अन्नाला स्वत:ची चव असते; त्यात आपण आपली गोडी आणि आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वत:ची अशी चव नाही. त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यात घालू तितके ते अधिक गोड वाटेल. पंढरपूरला जायला पुष्कळ रस्ते आहेत, परंतु सर्वांना शेवटी ' बारीतून ' जाऊनच दर्शन घ्यावे लागते; त्याप्रमाणे, इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे, ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे, आणि ते घेता घेता शेवटी स्वत:ला विसरून जावे, हाच नामसाधनेतला आनंदाचा मार्ग आहे.

जसे आपले आपलेपण आपल्या नावात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. आपण आज जे नाम घेतो तेच नाम शेवटपर्यंत कायम राहते; परंतु देहबुद्धी जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिकाधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते, आणि शेवटी नाम हे परमात्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे, तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे, की प्राणाबरोबरच ते बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्‍वास गेला पाहिजे.

१. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा अभंग (भाग तीन)

ज्योतिर्मय साहित्य

२ रा प्रयोग : साक्षीभावाने राहणे

साक्षी भावाने (अवचेतन मनाने) राहणे म्हणजे नियंत्रित होणे हा हा प्रयोग आहे. आपले बाह्यमन कितीही उड्या मारो, त्याकडे केवळ साक्षी भावाने पहायचे. असे करत गेले की मन हे तादात्म्य पावते. समजा डोके दुखते तर मनास वाटते आपलेच दुखते हा तादात्म भाव कमी करणे.

राग काढणे किंवा दमण करणे सोपे असते हे बाह्यमनाच्या नियंत्रणाने होते पण साक्षी भावाने राहणारे मन हे अभिव्यक्त ही करत नाही

हा हा प्रयोग आहे. घडणाऱ्या प्रसंगाला त्रयस्थ नजरेने पाहायचे. याला साक्षी भाव असे म्हणतात.

मीच मग राखण झालो हे राखण करणारे तिसरे मन अंतर मन वेगळे आहे राग काढणे किंवा दमण करणे सोपे असते ही बाह्यमनाच्या नियंत्रणाने होते पण साक्षीभावाने राहणारे मन हे अभिव्यक्तही करीत नाही. तुकाराम महाराज यांना जेव्हा त्यांच्या बायकोने ऊसाने मारले तेव्हा, त्यांना तिचा राग आला नाही. तो त्यांनी व्यक्तही केला नाही, आणि दमन ही केला नाही. तर त्यांनी या घटनेकडे केवळ साक्षी भावाने पाहिले. हा देह मला वापरण्यासाठी दिला आहे पण तो देह म्हणजे मी नव्हे.या देहास येणारा सुख दुःखाचा अनुभव हा त्रयस्थ नजरेने पाहणे यालाच साक्षी भाव म्हणतात.

३ रा प्रयोग : राग आल्यावर आरशासमोर उभे रहा* व कल्पना करा की, आरशातील प्रतिमा म्हणजेच आपणास ज्याचा राग आला ती व्यक्ती आहे. आता राग व्यक्त करा. राग कमी होईल. मग हसू येईल. मग लक्षात येईल, रागात असताना देखील, मनाचे एक केंद्र असे होते की, जे शांत होते.

४था प्रयोग : आरशासमोरील प्रयोग पुन्हा काही वेळानंतर पुन्हा पुन्हा आठवणे मनावर झालेले घाव आशा क्रोध करून संपवता येतात.

५ वा प्रयोग : सामूहिक हास्य करणे घरातील कोणी व्यक्ती रागात आली की इतर सर्वांनी सामूहिक हास्य करावे. हळूहळू राग शांत होईल.

६वा प्रयोग : केवळ मनाने विकार उपभोगून घ्या व साक्षी भावनेने हे म्हणून नाट्य तपासून घ्या हळूहळू विकार कमी होतील थोड्या थोड्या गोष्टीने जर तुम्हाला राग येत असेल तर ,तुम्ही बाह्य वस्तू व्यक्तीच्या हातातील खेळण्यात तुम्ही प्रतिक्रियावादी झालात. काहीतरी होते त्याची प्रतिक्रिया तुम्ही लगेच देता. क्रिया नाहीच केवळ प्रतिक्रिया होते. संताच्या क्रिया असतात प्रतिक्रिया नाहीत.

७वा प्रयोग : तुमची चेतना बाहेर जास्त वाहते. असे सतत करत गेल्यास तुमची किरणे नष्ट होतात. तुम्ही रिक्त होता. म्हणून तुमची अंतरमुखी चेतना वाढली पाहिजे. प्राणप्रवाह उर्ध्व झाला पाहिजे. नऊ द्वारातून बाहेर वाहणारी चेतना आत वळली पाहिजे. *ध्यान केल्याने बाहेर जाणारी चेतना परत आत घेता येते.

मनाचे चार खंड आहेत जागृती स्वप्न सुशुप्ती आणि तूर्या मनाला तूर्येत ठेवा मन थकूच देऊ नका शरीर थकू द्या.

८ वा प्रयोग : सूक्ष्म शरीरावर ध्यान करा व त्यातून निळा प्रकाश बाहेर येतो अशी कल्पना करा. मनाच्या शक्ती विखुरलेल्या असतात. अनेक विषयावर मन फिरत राहते. मनात चंचलत्व असते व त्याच्या शक्ती विखुरल्या जातात. मन केंद्रित करा. एकाग्रते कडून समाधीकडे जाण्यासाठी मन प्रसन्न हवे. साधकाला मनाची एकाग्रता करता यायलाच पाहिजे. एक काम एक विचार. *भूतकाळ व भविष्यकाळात न जाता मन हे वर्तमान काळातच ठेवता यायला हवे.

व्यक्ती विषय व वस्तू याविषयीची अनुकूलता म्हणजे संसारीक सिद्धी. यशस्वी होण्याचे गमक म्हणजे संकटातही प्रसन्न राहणे. प्रसन्न मनात प्रभु चेतना आकार घेते. म्हणून ''तू हे मन मी ची करी''अशी ओवी आहे. भगवंताचे मन प्रसन्न असते, त्याप्रमाणे आपलेही मन प्रसन्न करा. असेच सांगितल्या जाते.

मनावर येणारा ताण कसा कमी करायचा याचे अध्यात्मिक आणि वैज्ञानिक प्रयोग आज आपण पाहिले अभंगाचा उत्तरार्ध पुढील भागात आपण पाहूयात.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

३८. भक्ती

अंबे तुझिया चौकटी। रगडिती जे नाकटी।।
त्यांचिया पाय भूकटी। लावी जो भाळपाटी।।
नुरतसे आडकाठी। त्याचिया मुक्तीपाठी।।
बसता भवाची रट्टी। हास मायेच्या चौकटी।।

३९. विनवणी

अंबे आता कोणी नाही। तुझ्यावीण माझा त्राता।
नको नको फिरवू कुठे। देई पायी जागा आता।।
दाविलेसी जगरूपा। मारितसे ते गं थापा।
माते दाखविसी जगा। तुझ्या कृपे मी सनाथा।
चंद्रहास म्हणे माये। घेई कडेवरी आता।।

४०. विनवणी

दास मी तुझ्या पायीचा। नको आसरा कोणाचा।
सर्व सुखे तुझे ठायी। नको पसारा मोहाचा।।
नित्य राही तू अंतरी। तुझा शब्द गं धीराचा।
ऐसी स्मरावी गं गीते। शब्द माये अधीराचा।।
गातो गीत नित्य तुझे। नाही भाग इंद्रियाचा।
चंद्रहास म्हणे माझा। शब्द आहे अंतरीचा।।



## आरोग्य संजीवनी

### लेमन टी / लिंबू-चहा

ज्योतिर्मय साहित्य

नियमित घेतल्याने होतात जबरदस्त फायदे... दूधयुक्त चहा पिणे आरोग्यासाठी हानिकारकच आहे. तसेच हा चहा दिवसभरात दोन कपपेक्षा जास्त चहा पिऊच नये असे तज्ञही सांगतात... परंतु, तुम्हाला लेमन टी पिण्यास काहीच हरकत नाही. कारण, लेमन टी नियमित प्यायल्याने आरोग्य चांगले राहते. लेमन टी प्यायल्याने कोणकोणते फायदे होतात, हे जाणून घेवूयात....

आरोग्याच्या अनेक तक्रारींवर उपयुक्त !

हल्ली अनेकजण आपल्या आरोग्याबाबत जागरुक झाले आहेत. त्यामुळे व्यायाम आणि आहाराला आरोग्यात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

चहा म्हणजे भारतीयांचा वीक पॉईंट म्हटले तरीही वावगे ठरणार नाही. मात्र मागच्या काही काळापासून चहा आणि कॉफी आरोग्यासाठी चांगली नसते याबाबत बरीच चर्चा झाली. मग अनेकांनी सामान्य चहा घेणे बंद केले.

मात्र त्यामुळे ब्लॅक टी, लेमन टी/ लिंबू चहा यांसारख्या गोष्टींची मागणी वाढली. लेमन टी बनवणे सोपे असून तो शरीराचा क्लिंझर म्हणून उपयुक्त ठरतो. आता यामध्ये असे कोणते घटक असतात ज्याचे आरोग्याला फायदे होतात. याबाबत फारच कमी जणांना माहिती असते.

लेमन टी म्हणजे नेमके काय?....

लेमन टी म्हणजे कोरा चहा ज्यामध्ये लिंबू पिळलेले असते. लिंबामुळे या चहाला वेगळी चव येते. यामध्ये पाणी, चहा, खडीसाखर किंवा मध आणि लिंबू इतकेच असते. चहात लिंबू पिळल्याने त्याची केवळ चवच नाही तर रंगही बदलतो. कोरा चहा कोमट झाल्यावरच त्यात लिंबू पिळावा आणि मध टाकावा, गरम असताना या दोन गोष्टी टाकू नये याची विशेष काळजी घ्यावी.

क्लिंझर आणि डिटॉक्सिफायर

शरीरातील अनावश्यक टॉक्सिन्स बाहेर पडण्यासाठी लेमन टीचा उपयोग होतो. याबरोबरच शरीरात असणारे विविध संसर्ग आणि आजार दूर होण्यासही लेमन टी उपयुक्त ठरतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

सर्दी आणि तापावरील उपचार

लेमन टीमुळे सर्दी आणि ताप कमी होण्यास मदत होते. या चहाचा जास्त उपयोग व्हावा यासाठी यामध्ये थोडे आले टाकल्यास फायदा होतो. असा आले घातलेला चहा घेतल्यास घसेदुखीवरही आराम मिळतो. तसेच यामुळे प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. तसेच पावसाळी वातावरणात वाजणारी थंडी यामुळे कमी होण्यास मदत होते.

नैसर्गिक अँटीसेप्टीक

लिंबामध्ये निसर्गत: अँटीसेप्टीक गुण असतो. लेमन टीमध्ये अँटी बॅक्टेरीयल आणि अँटी व्हायरल घटक असतात. त्यामुळे एखाद्याला आधीपासून काही इन्फ ेक्शन किंवा आजार असतील तर ते बरे होण्यास मदत होते.

त्वचेसाठी उपयुक्त

आपली त्वचा छान नितळ असावी असे आपल्यातील बहुतांश जणांना वाटते. लिंबामध्ये व्हिटॅमिन सी असते, जे त्वचेसाठी अतिशय उपयुक्त असते. तसेच लिंबामध्ये ऍस्ट्रींजंटचे घटक असतात. त्यामुळे चेहऱ्यावरील पुरळ कमी होण्यास तसेच त्वचेच्या समस्या कमी होण्यास मदत होते...

अधिकचे फायदे....

१. लेमन टी मुळे पचनसंस्था निरोगी राहते. शरीरात उर्जा निर्माण होते. दिवसभर तजेलदार दिसू शकता.

**(क्रमशः)**

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

हनुमान सर्वत्र शोध घेतात. तिथे एक घर दिसले. त्यात भगवत नामाचा जप चालू होता वातावरण प्रसन्न दिसले.ते बिभीषणाचे घर होते.तिथूनहणुमान कडून अशोक वनात आले. हनुमानाने सीतेला आपली ओळख करून दिली.अंगठी दिली.व सीतेला मी तुम्हाला घेऊन जाऊ शकतो म्हणाले.सीता नाही म्हणाली. हनुमान हे उत्तम सेवक होते. जेव्हढे काम सांगितले त्या पेक्षा अधिकचे काम मनाने केले म्हणून ते उत्तम सेवक ते ठरतात.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

त्यांनी भूक लागली म्हणून सीतेच्या परवानगीने फळे खाल्ली, झाडे तोडली. सैनिक मारले.अनेक राक्षस मारले मग त्यांचेवर ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला गेला.त्याला मान ठेऊन त्यांना बांधु दिले. ते दरबारात गेले. लंका जाळली.

आता रामास मी हे केले ते केले असे मी ..मी.. म्हणून सांगते योग्य नव्हे. यामुळे प्रभूचा अवमान होईल, म्हणून आता ब्रम्ह देवाना सांगावे की मी काय केले. ते कांहीं आपला मालक नाहीत याचे जवळ मी मी करता येईल. त्याचे कडून हे वृत्त पत्रात लिहून घेऊ ते रामास दाखवू. लंका पेटली. शेपटीचा अग्नी विझविला. लंकेतील लोक या अग्नी तांडवाने विलाप करू लागले. पुन्हा ते सीता मातेकडे गेले. त्यांना वृतांत सांगितला. तिथून ब्रम्ह देवा कडे गेले. तसे पत्र घेतले व रामा कडे गेले. रामास आनंद झाला. मी इथे तुला काय देऊ? प्रभु राम म्हणाले मी तुला आलिंगन देऊ शकतो.सीतेने रामास देण्या साठी एक चुडा मणी दिला होता तो दाखविला.रामचंद्र प्रभू आता निःशंक झाले. इथून पुढे युद्धः कांड सुरू होते. **(क्रमशः)**

## फुलमाला....



लिलीचे फूल..

विविध मनमोहक रंग भुलविती
वसंत स्पर्शाने खुले लिलीचे फूल
सहा नाजूक पाकळ्या शोभती
याचे दुसरे नाव आहे एप्रिल फुल

चारी दिशेने फुलती ही फुले
सुबक हिरवी याची लांब पाती
आयुर्वेदात याचे तेल काढतात
यामुळे होते आपली सुंदर कांती

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य क्रीडा रत्न पुरस्कार संकेत काळे ह्यास जाहीर


ज्योतिर्मय साहित्य


**भोर –** राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने, संजीवनी एज्युकेशनल, कल्चरल अँड स्पोर्ट्स रिसर्च फाउंडेशन, पुणे, महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात येणारा ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्य क्रीडा रत्न पुरस्कार – २०२५'' संकेत संजय काळे ह्यास जाहीर झाला आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष अमित जगताप व सचिव अर्चना जगताप ह्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे तसे जाहीर केले आहे. मानपत्र, शाल, भारतीय संविधानाची प्रत व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यंदा पुरस्काराचे सलग दुसरे वर्ष आहे.

पुरस्कार प्राप्त शरीरसौष्ठवपटू संकेत काळे ह्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचा आंतरमहाविद्यालयीन श्री हा किताब सलग तीन वेळा प्राप्त केला आहे . तसेच ज्युनिअर महाराष्ट्र श्री, सीनियर महाराष्ट्र श्री ,ज्युनिअर मिस्टर इंडिया हे किताब प्रत्येकी एकदा पटकाविले आहेत.जागतिक शरीरसौष्ठव स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत असताना त्याने मिस्टर युनिव्हर्स या बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये रौप्य पदक जिंकले आहे. तसेच त्याने सलग दोन वेळा अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेच्या विजेतेपदाचा किताब मिळविला आहे. शरीरसौष्ठव पटू संकेत काळे ह्याने आतापर्यंत ४० पेक्षा जास्त बॉडी बिल्डिंग स्पर्धांमध्ये सहभाग व पारितोषिके मिळवली आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला ह्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील डोंगरगावचा सुपुत्र संकेत काळे पुण्यात गेली आठ वर्षे सराव करत आहे. सध्या तो पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे महाविद्यालय, सासवड येथे एम.ए.राज्यशास्त्र प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे. मेजर ध्यानचंद यांची जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने, शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ रोजी कोंढवा बुद्रुक, पुणे येथे पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.







विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## मैत्रीपर्व : गुरुदेव आणि महात्मा गांधी

सत्य, शिव आणि सुंदर ही भारतीय संस्कृतीची त्रिसूत्री. या तीन तत्त्वांची आराधना आणि उपासना भारतीय समाज प्राचीन काळापासून करत आला आहे. म्हटलं तर ही संस्कारत्रयी ! तिचा संस्कार गुरुदेवांच्या मनावर बालपणापासून झालेला होता. गांधीजींचा सत्य आणि शिव या दोन तत्त्वांवर अधिक भर होता तर गुरुदेवांचा त्या जोडीलाच सौंदर्यावरही भर असायचा. सत्य आणि शिवाची उपासना तर करायचीच परंतु त्याच्या जोडीला सौंदर्यवादी दृष्टिकोनही असायला हवा. त्यातूनच मानवाची रसिकता, सौंदर्यदृष्टी प्रत्ययास येते असे गुरुदेवांचे मत होते. त्या दोघांमधील एक प्रसंग त्यांच्या या दृष्टीकोनाची साक्ष म्हणून सांगितला जातो. तो कितपत खरा आहे याची माहिती नाही. परंतु गुरुदेवांचा सौंदर्यवादी दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी तो महत्त्वाचा ठरतो.


गांधीजी एकदा शांतीनिकेतन मध्ये राहायला गेले होते त्यावेळेसची ही गोष्ट आहे. गांधीजी नियमितपणे रोज फिरायला जात. त्यावेळी बरेचदा गुरुदेवही सोबत जात असत. अशाच एका प्रसंगी गांधीजी बाहेर फिरायला जाण्यासाठी निघाले असताना गुरुदेवांनी त्यांना आपल्याला सोबत येऊ देण्याची विनंती केली. गांधीजी त्यांच्यासाठी थांबले. गुरुदेवांनी आरशासमोर उभे राहून आपले केस विंचरले, आपले कपडे ठाकठीक केले. परंतु त्यांना तयार होऊन येण्यासाठी बराच वेळ लागला. तेवढ्या वेळात वाट पाहून गांधीजी कंटाळले. ते गुरुदेवांना म्हणाले, '' एवढा सगळा जामानिमा करण्याची काही गरज होती का ? आता या वयात तुमच्याकडे कोण बघणार आहे ? '' त्यावर गुरुदेवांनी हसतमुखाने मोठे सुंदर उत्तर दिले. ते म्हणाले, '' मी कुरूप दिसलो तर बघणाऱ्यांच्या मनाला वेदना होतील. देखणा दिसलो तर त्यांना आनंद होईल. कुरूपता ही हिंसा आहे आणि सुंदरता ही अहिंसा !'' गांधीजी हे अहिंसेचे पुजारी होते हे आपल्याला माहिती आहे. परंतु अहिंसेची ही नवीन व्याख्या गुरुदेवांनी गांधीजींना सांगितली. यातून गुरुदेवांचा सौंदर्यवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. सुंदर दिसायचे किंवा चांगले राहायचे ते केवळ आपल्या स्वतःसाठी नव्हे तर इतरांनाही ते चांगले वाटते आणि वाटावे म्हणून !


गुरुदेव आणि महात्माजी यांच्यामध्ये काही बाबतीत मतभेद होते परंतु या महापुरुषांनी आपले मनभेद त्यामुळे कधीही होऊ दिले नाहीत. केवळ चरखा चालवून आणि सूत कातून शेतकरी स्वावलंबी होणार नाहीत आणि स्वराज्य मिळणार नाही. समोर कुठलातरी विधायक कार्यक्रम असल्याशिवाय शाळा कॉलेजवर तरुणांनी सरसकट बहिष्कार टाकू नये. नंतरच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत उतरावे नाहीतर ते विध्वंसक बनतील असे गुरुदेवांचे मत होते. १९२२ च्या आंदोलनात सत्याग्रही हिंसक झाले आणि त्यांनी चौरीचौरा येथे एक पोलीस चौकी जाळली आणि गुरुदेवांच्या या विचारांचे प्रत्यंतर आले. अर्थातच गांधीजी सुद्धा या गोष्टीमुळे व्यथित झाले आणि त्यांनी हे आंदोलन मागे घेतले.

गांधीजी जेव्हा जेव्हा उपोषणाला बसत तेव्हा त्यांच्या प्रकृतीचा विचार मनात येऊन गुरुदेव काळजीत पडत. पुण्यात जेव्हा येरवड्याच्या तुरुंगात गांधीजींनी जेव्हा उपोषण सुरू केले तेव्हा त्यांची काळजी वाटून त्यावेळी ७२ वर्षे वय असलेले गुरुदेव त्यांच्या भेटीसाठी धावून गेले. यावेळी गांधीजींनाही त्यांचीच आठवण येत होती. आणि गांधीजींच्या मनात त्यांच्या कवितेच्या ओळी घोळत होत्या.

(क्रमशः)









## इंदापूरी निखारे

## खरं स्वातंत्र्य...



ज्योतिर्मय साहित्य

इसवी सन २०५०...
म्हणजे आत्ताचे पालक...
आजी आजोबा होतील तेव्हा...
असा सहज त्यांच्या मनात विचार आला...
आता तो आणि ती निवृत्त झाल्यामुळे...
थोडाफार विचार करण्याचे स्वातंत्र्य उपभोगू शकत होते...
त्या दोघांचा संसार तसा खूपच छान झाला...
सद्ध्याच्या काळानुसार...
मुलगा, मुलगी उच्च शिक्षित झाले...
दोघेही परदेशी नोकरी...
जावई, सून सगळेच...
आईबापाला आपण घेतलेल्या कष्टांचे सार्थक झाल्याचा आनंद... पण खंत एकच होती...
मुलाने भारतातच नोकरी करावी...
पण मुलाने स्पष्ट नकार दिला...
एव्हढा अभ्यास कशाला करायला लावला?
उच्च शिक्षण घेतले ना!
तुमच्या इच्छेनुसार...
मुलीने पण सांगितले... मला तर जमणार नाहीच...
आता आमचे आम्ही पाहू...
एक दिवस मुलगा आला...
ही अमुकतमुक.. मी हिच्याबरोबर लग्न करत आहे..
मुलगी पण एक दिवस आली...
हा अमुकतमुक..मी याच्याबरोबर लग्न करत आहे.
दोघे आईबाप नाराज झाले...
निदान आपल्या जातीतील तरी सून, जावई असावे... असे वाटले...
पण स्वतःच स्वतःचे समाधान करून घेतले...
आजकाल मुलं, मुली कुठे ऐकतात?
निदान आपल्या धर्मातच केले ना!
ते लिव्ह इन मध्ये न राहता... प्रेम विवाह केला...
आणि आपल्याला सांगून...
मुलामुलीच्या लग्नाचा आनंद मिळाला नाही...
निदान लग्न तर केले!
नाहीतर आजकाल लग्न न करता असेच राहतात...
एखादे वर्ष गेले असेल...
मुलगा, मुलगी फोनवर बोलायचे...
पण हळूहळू भावनांमधील ओलावा नाहीसा होत गेला... मुलगा सुनेच्या बाळंतपणासाठी बोलावेल...
असे वाटत होते...पण त्याने सुनेच्या आईला बोलावले...
आणि मुलीने नवऱ्याच्या आईला...
व्याव्हारिक दृष्टीने बरोबर असेल पण...
पण भावनांना मात्र तडा गेला...
दोघांनी वृद्धाश्रमात जायचा निर्णय घेतला...
आणि फ्लॅट विकून टाकला...
वृद्धाश्रमात स्वतंत्र छोटा फ्लॅट घेतला...
आणि काही दिवसात रमून गेले...
आयुष्यभर रक्ताची नाती सांभाळून ठेवण्यासाठी केलेली धावपळ... अगदी मुलामुलीने पण...
त्याची खंत वाटेनासी झाली...
कधी कधी जाणवते... अनेक नातेसंबंधाना ...
एका धाग्यात बांधून ठेवले...
पण मैत्री या साठी मात्र नाही...
एक मुक्त नातं... मैत्री या भावनेत...
भावुन जाते... मैत्रीत ना जात, धर्म...
ना भाषा, राज्य, देश...
पण मैत्री बाबत मात्र नाही ...
ती भावनाच अवर्णनीय!
सर्व भाव भावनेच्या पेक्षा वेगळी ...
खरं स्वातंत्र्य तर आत्ताच उपभोगत आहे...
याचा आनंद होत होता...
रक्ताची नाती कायम बरोबर नसतातच...
आपणच त्यांच्या पंखाना उंच उडण्यासाठी सर्वस्व देतो...
त्यांनी घेतलेली उंच भरारी पाहून...
मनस्वी आनंद होतो...
मनात न कळत कृष्ण आठवण करून देतो...
माणसाने कर्म करत रहावे...
फळाची अपेक्षा न करता...
बहुतेक मृत्यूला आनंदाने सामोरे जाण्याचे बळ मिळावे म्हणून...
आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत...
बरोबर असणाऱ्या नवीन नातेवाईकांच्या बरोबर...
पुन्हा एकदा... शेवटची काही वर्षे...
मुक्तपणे उधळून द्यायची...
अंतिम श्वासापर्यंत रक्ताच्या नात्यांना वेळ नसतो...
जुळवलेली नाती मात्र... आवर्जून वेळ काढतात...
त्यांच्या डोळ्यातून न दिसणारे अश्रू...
मरण्यासाठी... बळ देतात...
अंतिम श्वासापर्यंत जगण्याचे!

# उत्सवांना विधायक वळण द्या....

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

बघा, असे म्हणत आपण घरोघरी शोडपचारे पूजा करून गणपतीची स्थापना करीत असतो. मोदकांचा नैवेद्य दाखवत असतो. महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुरुवात पेशव्यांचे काळात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थी पासून दशमी पर्यंत सात दिवस हा उत्सव होत होता. गणेश उत्सवाला सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप १८९३ सालापासून मिळाले त्यावेळी लोक जागृतीचे एक मुख्य साधन म्हणून प्रबोधनाचे स्वरूप दिले. लोकमान्य टिळकांनी समाजात एक्याची भावना वाढावी या हेतूने गणेशोत्सवाची त्यासाठी निवड केली आणि त्यावेळी हा उत्सव गणेश चतुर्थी पासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत असा दहा दिवस सुरू करण्यात आला. त्यावेळच्या परिस्थितीत सर्व समाजाला एकत्र करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी हा त्यामागचा मोठा उद्देश होता. अर्थातच स्वातंत्र्य आंदोलनात सार्वजनिक गणेशोत्सवात जे लोक जागृती कार्य केले ते उल्लेखनीय आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात पुण्यात झाली आणि हळूहळू तो संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होऊ लागला. राजकीय व्यक्तिंच्या प्रवेशामुळे, पाठबळामुळे उत्सवांना वेगळे स्वरूप प्राप्त होत आहे हे सत्य नाकारता येणार नाही. कारण राजकीय व्यक्तींकडून आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी अशा मंडळांना मोठ्या मोठ्या देणग्या देऊन आकृष्ट केले जाते. परिणामी हा पैसा योग्य कामी खर्च न होता फक्त डी.जे, रोशणाई, मोठ मोठ्या मूर्ती आणि इतर अनेक कारणासाठी खर्च होतो,

फार कमी मंडळाकडून विधायक कामे होतात. गणेश मंडळात असणारी बहुसंख्य मंडळी ही तरुणच असते आणि अशावेळी त्या मंडळाकडून होणाऱ्या कार्यक्रमाला विधायक स्वरूप कसे प्राप्त होईल, सामाजिक ऐक्य कसे टिकून राहील, पर्यावरणाचा विचार कसा केला जाईल किंवा प्रदूषण निर्माण होणार नाही याची दखल घ्यायला हवी. उत्सवात पूजेसाठी मातीची मूर्ती असावी असे उल्लेख आहेत. आणि संकल्पात सुद्धा मृण्मय पार्थिव महागणपती पूजनं करिष्ये. असे म्हणण्याचा प्रघात आहे .कारण कर्मकांडातील बहुतेक पूजा ह्या विशेष कालावधीनंतर विसर्जित केल्या जात असतात, म्हणूनच घरात आणली जाणारी गणपतीची मूर्ती ही आपल्याला स्वतःला आणता येईल एवढे असावी, अनेक ठिकाणी महापालिकांनी पी.ओ.पी. गणेश मूर्तीवर बंदी आणलेली आहे. प्रदूषण महामंडळा कडून त्याविषयी आदेश काढले जातात. गणेशोत्सव



हा तर महाराष्ट्रातला सगळ्यांचा आवडता आणि मोठा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. सध्याच्या परिस्थितीत ह्या उत्सवाचे स्वरूप खूप बदलले आहे. धार्मिकते पेक्षा ईतर गोष्टींना महत्व दिले जाते. मोठया मूर्ती, देखावे झगमगाट,रोषणाई, डी.जे.च्या तालावर कर्कष्य गाणी,हे प्रमाण वाढले आहे. बाजारात सिंगल यूज प्लास्टिक मध्ये सजावटीच्या प्लास्टिकच्या फुलांचा समावेश नसल्याने बाजारपेठेचत सर्रास विकले जातात. लोकमान्य टिळकांनी ज्या विचारांनी घरातल्या गणपती बरोबरीने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली,त्याचा जवळपास विसर पडल्या सारखा झाला आहे. अगदीच तुरळक मंडळात गणपती अथर्वशीर्षाचे पठण होते. पुण्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला ऋषिपंचमीला दगडूशेठ गणपती समोर अथर्वशीर्षाचे पठण करतात. काही ठिकाणी अथर्वशीर्ष पठणाच्या स्पर्धा घेतल्या जातात. काही वर्षापूर्वी गणेश व्याख्यानमाला सारखे उपक्रम केले जात होते.निरनिराळ्या विषयावरचे विचार ऐकायला मिळायचे. देखावे,रोषणाई, तर करावीच पण ह्या गोष्टीलाही प्राधान्य होते आता काही ठराविक ठिकाणीच असे व्याख्यानमालाचे कार्यक्रम आयोजित केले जातात अथर्वशीर्ष पठण स्पर्धा घेतल्या जातात. डी.जे. च्या कर्कष्य तालावर जी गाणी लावली जातात,तो प्रकार कुठेतरी थांबावा असे वाटते.उत्सव साजरा करण्यातूनच आनंद,समाधान, जरुर मिळायला हवे पण त्यापासून कोणाला त्रास होणार नाही हा विचारही असायला हवा. म्हणूनच हा उत्सव साजरा केला जातो उत्सवा मागचे खरे धार्मिक, सांस्कृतिक, प्रबोधन महत्वाचे विषयांचा, उद्देशाचाही विसर पडायला नको.

उत्सव साजरा करताना जर आपण काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्या उत्सवाचे हेतू आणि पावित्र कायम राहील गणेश मूर्ती निवडताना ती शाडूच्या मातीची किंवा इको फ्रेंडली असावी. प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा थर्मोकोलची नसावी. मूर्तीची उंची प्रमाणात असावी.



दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७

उत्सवात आकर्षक पण कमी वीज लागणारी रोषणाई केली तर विजेची बचतही होते.

आरास करतानाही ती पर्यावरण पूरक तसेच आरोग्यासाठी हानिकारक ठरणार नाही असेच रंग वापरावे.

सरकारने बंदी आणलेल्या प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

उत्सवाचे काळात आपल्या उत्साहामुळे म्हणजेच डी.जे लाउड स्पीकर याच्या वापरामुळे आजूबाजूच्या परिसरातील दवाखाने, शाळा, यांना त्रास होणार नाही हे बघायला हवे. रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही ही काळजी हवी.

मूर्ती विसर्जनाच्या वेळी ठीक ठिकाणी तात्पुरते तळे किंवा तलाव त्या त्या ग्रामपंचायत नगरपालिका यांनी उपलब्ध करून द्यावे.

अपप्रकर घडणार नाही अपप्रवृत्तीचा शिरकाव होणार नाही याची काळजी मंडळाचे कार्यकर्त्यांनी घ्यावी.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या सार्वजनिकतेत जो सांस्कृतिक वैभवचा ठेवा दिला आहे त्या निमित्ताने या उत्सवात सर्वांनी एकत्र यावे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे व्हावे, स्पर्धा व्हाव्यात एकमेकात बंधूभाव, देशप्रेम निर्माण व्हावे आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य कायम ठेवून लोकसंस्कार व्हावे तरच गणेशोत्सव साजरा करण्याचा हेतू साध्य होईल.

सगळे सण,उत्सव साजरे करत असताना सामाजिक भान ठेवायला हवे. आपल्या संस्कृतीला शोभेल असेच धार्मिक आणि विधायक कार्यक्रम आखून उत्सव साजरे व्हावेत. अशा प्रकारचे उत्सव, सण, हा सर्व आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. ठिकठिकाणी गणपती मंडळांनी या गोष्टीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आता शासनाने गणेशोत्सवाला राज्याचा उत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्या दृष्टीने त्यांनी आखून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. राजकीय नेत्यांचा कार्यक्रमास सहभाग असला तरी त्यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप बिघडणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. राज्य उत्सव म्हणून जिल्ह्या जिल्ह्यात उत्कृष्ट विधायक कार्य करणाऱ्या, देखावे सादर करणाऱ्या, आणि नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांना बक्षिसे जाहीर करून त्यांचा सत्कार करावा त्या निमित्ताने उत्कृष्ट कार्य करण्याची मंडळांमध्ये चढाओढ लागून मंडळाच्या कामात शिस्त निर्माण होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही. मोरया.. मोरया..

बोला गणपती बाप्पा मोरया.. मोरया.. .

# ''उत्तरायण'' दोन संवेदनशील मनांच्या प्रवासाची कथा

**ज्योतिर्मय साहित्य**

''उत्तरायण'' ही केवळ प्रेमकथा नसून, ती दोन संवेदनशील मनांच्या चारू आणि प्राजू यांच्या भावनिक प्रवासाची, विरह आणि पुनर्मिलनाच्या वाटेची, तसेच काळ, संस्कार आणि नियतीच्या खेळाची हळुवार मांडणी आहे. कथानकाची सुरुवात एका व्यक्तिमत्व विकास शिबिरातून होते, जिथे ग्रामीण पार्श्वभूमीचा चारू आणि शहरी, बुद्धिमान प्राजू प्रथम भेटतात. साहित्य, संस्कृती, कविता आणि विचारांच्या माध्यमातून त्यांच्यात हळूहळू जिव्हाळ्याचं बंध निर्माण होतं.




शिबिरानंतर सुरू झालेलं त्यांचं पत्रलेखन हे कथेचं आत्म्याचं अंग आहेकाळ्या शाईतून उमलणाऱ्या भावना, औपचारिकतेतून सहजतेकडे जाणारी भाषा, आणि न बोलता उमगणाऱ्या ओढीचं सूक्ष्म चित्रण. पण नियती दोघांच्या आयुष्यात वळणं आणते.आणि शेवटी वर्षांनंतरचा अनपेक्षित संयोग पुन्हा त्यांना एकत्र आणतो.

पात्रचित्रण

चारू पारंपरिक मूल्यांवर श्रद्धा असलेला, विद्वान, भारतीय संस्कृतीशी नाळ जपणारा आणि कवीमनाचा. तो ठाम, तरीही मनाच्या भावविश्वात नाजूक असतो.

प्राजू आधुनिक शिक्षण घेतलेली पण संस्कृतीशी निष्ठा राखणारी, भावनाशील, बुद्धिमान आणि कलाप्रिय. तिच्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वासाबरोबरच संयमाचं वलय आहे.

**पुस्तक परीक्षण**
**सौ. रोहिणी पांडे, पुणे**
**मो. ९५५२४९२४०९**

सहपात्रेनीलिमा, गंधाली, मित्रपरिवारही कथेला वास्तवदर्शी आणि जिव्हाळ्याची किनार देतात.

संदेश कादंबरीचा मुख्य गाभा म्हणजे संवादाचा अभाव आणि त्यातून निर्माण झालेली अंतरं. लेखक दाखवतो की, नात्यातील गोंधळ, संकोच, आणि ''आधी कोण बोलणार?'' हा प्रश्न अनेकदा वर्षांचा विलंब आणि विरह घडवू शकतो. पण खरी मैत्री आणि प्रेम हे काळ, अंतर, अडचणी यांवर मात करून पुन्हा उजळू शकतात. संस्कृती, नात्यांची शुद्धता, आणि परिपक्वतेने जगण्याची प्रेरणा हा या कादंबरीचा आत्मा आहे.

भाषाशैली व मांडणी लेखकाची भाषा प्रवाही, भावपूर्ण आणि संवेदनशील आहे. संवादांमध्ये नैसर्गिक ओघ आहे, तर वर्णनांमध्ये दृश्यात्मकता जाणवतेपावसाळ्यातील टेकड्या, शिबिरातील वातावरण, पत्रांमधील शब्दसुगंध, भेटींचे क्षणहे सर्व वाचकांच्या मनात प्रतिमा उभ्या करतात. पत्ररूप शैली, कविता, गाणी आणि स्मरणरंजन या सर्वांचा उत्तम संगम आहे.

भावनिक प्रभाव कथेत अनेक ठिकाणी वाचकाला हळवे करणारे क्षण आहेतपहिली भेट, कवितांचे आदानप्रदान, हरवलेली वर्षं, आणि शेवटी देवीच्या मंदिरात मिळालेला पुनर्मिलनाचा आशीर्वाद. हसरा चंद्र यांनी भावनांचा ओलावा कुठेही कृत्रिम न वाटता सुसंस्कृतपणे रेखाटला आहे.

सारांश ''उत्तरायण'' ही विरहातून वसंताच्या पुनरागमनाची कथा आहेजिथे दोन मनं संस्कार, संयम, आणि स्नेह यांच्या धाग्यांनी पुन्हा एकत्र येतात. प्रेमकथा वाचणाऱ्यांसाठीच नव्हे, तर नात्यांच्या गूढतेत, भारतीय सांस्कृतिक मूल्यांत, आणि संवादाच्या सामर्थ्यात रस असणाऱ्या प्रत्येकासाठी ही कादंबरी एक हृदयस्पर्शी अनुभव ठरते.

लेखक हसरा चंद्र . भाषा मराठी

ई बुक आणि मुद्रित दोन्ही स्वरूपात उपलब्ध

प्रकाशन – शॉपिजेन प्रकाशन, अहमदाबाद

लिंक – https://shopizen.app.link/07q32FbbNVb

# पत्र लेखन – थोडंसं वेगळं...

**ज्योतिर्मय साहित्य**


दुपारी सहज जुनी रद्दी काढत असताना काही जुनी पत्रे हाती लागली. वाटले अरे व्वा! सहज म्हणून वाचत गेले अन् आजूबाजूची परिस्थिती पाहता आणि पत्रातील तो मजकूर वाचून म्हणजे ते लेखन माझेच होते. अर्थात त्यात कुटुंबातील तर होतेच, पण त्यातच अगदी शेजारचे आणि इतर नातेवाईक आणि त्यांची मनापासून विचारलेली ख्यालीखुशाली पाहून मनाला एक प्रश्न पडला. अरे वा ! हे तर आत्ता आत्ताचेच आहे. खरचं मागच्या काही म्हणजे वीस बावीस वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. आपण ही.. आणि आत्ताची परिस्थितीत किती फरक आहे. डिजिटलच्या या युगात माणूस एका क्षणात अगदी सामोरा समोर येऊन बोलू शकतो. एकमेकांना पाहू शकतो. थोडक्यात काय जग जवळ आले आहे चा आंनदानुभव तर आहेच.

पण सहज वेगळे काहीतरी सुचले ते.. म्हणून केलेले हे पत्र लेखन.

प्रिय समय, वि. वि.

पत्र लिहिण्यास कारण,

गेले ते दिवस, नि मनात उरल्या फक्त त्या अनामिक सावल्या, दूरवर खूप दूरवर हरवलेल्या, पण खर सांगू तुला, कधीतरी येतात ना तेव्हा काळया पापण्यांवर शुभ्र अशा मोत्यात सारा जीवनपट उलगडून दाखवतात, नी मग ओघळता ओघळता एक नवी ऊर्जा नव चैतन्य देवून जातात. किती छान आयुष्य होत ते, निसर्गाच्या सानिध्यात कौलारू विटा मातीच्या घरात गुण्यागोविंदाने एकत्र नांदणारे प्रेम, माया,




ममता अंगणात असलेल्या तुळशीतल्या निरांजनचा तुळशवृंदावन भोवती पडलेला तो मंद तांबूस प्रकाश. चांदण्यात पडलेल्या त्या ज्योतीची नि त्या निरांजनाची ती मुक पण जिवंत अशी भाषा, मध्यरात्रीचा झाडामागचा तो चंद्र, नदीच्या पाण्यात हाताने उडवलेले ते पाणी, पावसाळ्यात पोत्याची खोळं घेवून प्लॅस्टिकच्या पिशवीत घातलेल्या त्या वह्या, शेतातल्या पाटाच्या पाण्यात पाय घालून उडी मारल्यावर झालेला डबुक डूबुक आवाज, अण्णा दादांच्या कडून घेतलेले ते पाच, दहा वीस पैसे ते चार आणे आठ आणे यात्रेत ते रंगीत जिलेटिनचे चष्मे, डमरू आणि तात्यांच्या खांद्यावर बसून देवाच्या



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

पालखीला लावलेला हात, किती न किती गोष्टी, पाच दहा पैशात नाती गुरफटलेली होती. तेच सार आहे. पण यांच्यात काही तरी कमी आहे. असे उगाच वाटत राहते

पण आता ते पाच न दहा पैसे राहुदे, परिवर्तन काळाचा नियम आहे. आणि तो मान्य आहे. जी माया ममता पाच दहा पैशात गुरफटलेली होती. ती आता पाच दहा हजार रुपये आहेत. माया ममता अजूनही आहे. पण त्याचे समाधान कुठे हरवले आहे. माहित नाही. मोकळा श्वास घेताना सुद्धा दम लागल्यासारखं होतेय.

तेव्हा बाजाराला गेलेली माणसे एक नोट मोडून म्हणजे (१००रू.) तीन चार पिशव्या भरून घरी घेवून यायची, नी मग काय....पण आता...?

चार पाच नोटा मोडून एक सुद्धा पिशवी नीट भरत नाही. म्हणजे कोणाला दोष नाही द्यायचा. तेव्हा चिंध्याच्या गोधडीत सुध्दा सुंदर सुंदर स्वप्न बघत नव्याने झुंजू मुंजू करत मंद मंद वारे वाहत नवी पहाट यायची, आणि आत्ता संध्याकाळी मऊ मऊ गादीवर नी एसीत झोपून सुद्धा सुंदर स्वप्ना ऐवजी निद्रिस्त झालेल्या चेहऱ्यावर सुध्दा टेन्शन ची लकेर उमटलेली दिसते. रूटीन, धावाधाव, गडबड, तेव्हाही होती. आजही आहेच. आणि असणार ही आहे. पण आजची ही वेळ काही औरच आहे.. म्हणजे आत्ताची वेळ खराब आहे, असं मुळी म्हणायचे नाही. म्हणायला गेले तर सुख समाधान मानण्यात आहे. विचाराच्या प्रगल्भतेत आहे. पण तरीही एक प्रश्नचिन्ह आहे. का?

असो! परिवर्तन काळाचा नियम आहे. गेला तो भूतकाळ भूत काळापेक्षा येणाऱ्या भविष्य काळाचा विचार व्हायला हवा. गेलेली वेळ गेली. पण म्हणतात ना की भूतकाळाच्या वेलीवर भविष्यातली कळी उमलत असते. चला तर उमलनाऱ्या त्या सुंदर कळी कडून एक नवी प्रेरणा घेऊन नवी ऊर्जा घेऊन येणाऱ्या भविष्याचा हसत स्वीकार करू. पण तरीही तेव्हाच्या दिवसांची त्या भूतकाळाची हरवलेल्या, त्या सुंदर वेळेची मी खरचं ऋणी आहे. ऋणी राहीन. आणि अशाच सुंदर समायाच्या प्रतीक्षेत असलेली ... एक आकांक्षा....

# मराठी भाषा विभागामार्फत 'अभिजात मराठी माझ्या अपेक्षा' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – केंद्र सरकारच्या ३ ऑक्टोबर २०२४ च्या अधिसूचनेन्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्या अनुषंगाने राज्य शासनाने शासन निर्णय निर्गमित करून ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस तर ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे.

मराठी भाषा विभागातर्फे मराठी भाषा दूत ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा जगभरातील १८ ते २१ वयोगटातील मराठी बोलणाऱ्यांसाठी खुली असेल. 'अभिजात मराठी-माझ्या अपेक्षा' या विषयावर जास्तीत जास्त तीन मिनिटांचा वेळ प्रत्येक स्पर्धकाला देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे संयोजन 'ऑगस्ट मीडिया' या संस्थेतर्फे केले जाईल. ही स्पर्धा ८ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन




पद्धतीने घेण्यात येईल. महाराष्ट्रातील वेगवेगळे महसूल विभाग तसेच बृहन्महाराष्ट्र मिळून प्रथम नोंदणी करणाऱ्या १००० स्पर्धकांना प्रवेश मिळेल.

स्पर्धकांनी विषयाचे आकलन करून तो विषय आपल्या पद्धतीने मांडणे अपेक्षित आहे. यामधून जास्तीत जास्त १०० उत्तम स्पर्धकांची निवड ''मराठी भाषा दूत'' म्हणून करण्यात येईल. तसेच, सर्व सहभागींना महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. यासाठी गुगल फॉर्म पाठवण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५, रात्री १२ पर्यंत आहे.

या स्पर्धेसाठी १८ ते २१ या वयोगटातील युवकांनी ऑनलाईन स्पर्धेमध्ये https://forms.gle/NYvWxvYCSFXCjkzn9 या लिंकवर नोंदणी करावी, असे आवाहन मराठी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559